महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद-४३१००२
Maharashtra State Board of Waqfs, Panchakki, Aurangabad-431002
مہاراشٹر اسٹیٹ وقف بورڈ، پن چکی، اورنگ آباد۔ ۴۳۱۰۰۲
Webside: www.mahawakf.com, Email: ceomsbw@gmail.com Tele: 0240-2401584, 2991259

No. मरावमं/आस्थापना/ १६३५ /२०२४ दिनांक: २३.०२.२०२४

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामार्फत दिनांक ४.०८.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता पदाची निवडसुची** (Select List)

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील विविध संवर्गातील ६० पदे भरतीसाठी दिनांक ४.०८.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या उमेदवारांची परीक्षा दिनांक ३.०१.२०२४ व दिनांक ४.०१.२०२४ रोजी घेण्यात आली होती. जाहिरातीमधील परिच्छेद क्रमांक ०५ येथे नमूद केल्याप्रमाणे परिक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करणा-या उमेदवारांची गुणवत्ता यादी दिनांक १६.०२.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

जाहिरातीमधील रिक्त पदे, प्राप्त गुणवत्ता यादी या बाबी विचारात घेता तसेच निवड समितीने दिनांक २२.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार कनिष्ठ अभियंता या संवर्गातील १ रिक्त पदावरील नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे निवडसूची जाहिर करण्यात येत आहे :-

**अ) निवडसूची :-**

| अ.क्र. | रोल नंबर | नोंदणी क्रमांक | नांव | जन्मदिनांक | लिंग | प्राप्त गुण | गुणवत्ता क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **List of Selected Candidates for Jr Engineer (Total Posts - 01)** | | | | | | | | |
| 1 | 2210000002 | 329004978 | SAHIL SHAHAJAN PATHAN | 10/9/1998 | M | 162 | 1 | Selected |

उपरोक्त निवडसूची व्यतिरिक्त निवड समितीच्या मान्यतेनुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अतिरिक्त निवडसूची/प्रतिक्षा यादी देखील जाहिर करण्यात येत आहे :-

**ब) अतिरिक्त निवडसूची/प्रतिक्षायादी:-**

| अ.क्र. | रोल नंबर | नोंदणी क्रमांक | नांव | जन्मदिनांक | लिंग | एकूण गुण | गुणवत्ता क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Waiting List** | | | | | | | | |
| 1 | 1710000078 | 329004905 | SAQUIB SHAFIQUE SHAIKH | 8/6/1999 | M | 156 | 2 | Waiting List-1 |
| 2 | 3110000011 | 329003021 | SALMAN KHAN NASIR KHAN | 20-07-94 | M | 152 | 3 | Waiting List-2 |

उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करतांना चुकीची माहिती सादर केल्याचे प्रमाणपत्र/ कागदपत्र पडताळणी (Documents Verification) दरम्यान आढळून आल्यास जाहिरातीमधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ मधील तरतुदीनुसार उमेदवारास पुढील भरती प्रक्रियेकरिता अपात्र ठरविण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

उपरोक्त निवडसूची १ वर्षासाठी (दिनांक २१.०२.२०२५ पर्यंत) वैध राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. उपरोक्त निवडसूचीतील उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजु न झाल्यास किंवा अर्ज करतेवेळी चुकीची माहिती भरली असल्याचे किंवा प्रसिद्ध जाहिरातीत नमूद आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता/अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रुजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यु झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील.

निवडसूचीतील प्राधान्यक्रम हा उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करताना भरलेल्या माहितीच्या आधारे निश्चित करण्यात आला आहे. जाहिरातीमध्ये परिच्छेद क्र. २२ मध्ये नमूद तरतुदीनुसार निवडसूची तयार करण्यात आली असून ज्या पात्र उमेदवारांचे एकूण गुण समान आहेत अशा उमेदवारांचा निवडसूचीतील प्राधान्यक्रम जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ४.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे:-

१) आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य असल्यास (Preference-१)

२) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य नसेल अथवा वरील अनुक्रमांक (१) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त ठरत असल्यास वयाने ज्येष्ठ असलेला उमेदवार (Preference-२)

३) वरील दोन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य (Preference-३)

४) उपरोक्त (१), (२) व (३) मधील अटी देखील समान ठरत असल्यास पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चत्तम गुण प्राप्त केलेला उमेदवार (Preference-४).

सदर प्रसिद्धीपत्रक https://mdd.maharashtra.gov.in, https://mahawakf.com व https://mahawaqf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर रोजगार/भरती या मथळ्याखाली प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

**(मो.बा.ताशिलदार)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद**